दुरध्वनी क्रमांक: 0240-254200
फॅक्सक्रमांक : 0240-2654247
ई-मेल : srpfgr14@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
भारत राखीव बटालियन -1
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.14,
सातारा परिसर छत्रपती संभाजीनगर-431010.

## राज्य राखीव पोलीस बल गट क्र.14 (भाराब-1), छत्रपती संभाजीनगर सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन - 2022-23 च्या लेखी परीक्षेबाबत

**दिनांक :- 10/07/2024**

## उमेदवारांकरीता सुचना

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.14 (भाराब-1), छत्रपती संभाजीनगर या आस्थापनेवर सन 2022-23 मध्ये रिक्त असलेल्या 173 पदांकरीता सशस्त्र पोलीस शिपाई भरती प्रक्रिया मैदानी चाचणी दि.19/06/2024 ते दि.03/07/2024 या कालावधीत घेण्यात आली होती.

त्यामध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे महाराष्ट्र सशस्त्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश), नियम-2012 व त्यानंतर शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा नुसार शारीरिक चाचणीत किमान 50 टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार यांची संबंधीत प्रर्वगामधील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदांच्या अनुषंगाने 1:10 या प्रमाणे लेखी परीक्षेसाठी निवड करण्यात आली आहे. सदरहू निवड यादी 1) www.mahapolice.gov.in, 2) policerecruitment2024.mahait.org **व** 3) www.maharashtrasrpf.gov.in या वेबसाईटवर व या घटकाचे मुख्य प्रवेशद्वार येथे नोटीस बोर्डावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक 14/07/2024 रोजी **" महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी "** (MIT, Collage), **गेट नंबर**.01 **व गेट नंबर**.05, **बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर शहर येथे** 11.00 ते 12.30 वाजेपावेतो घेण्यात येणार आहे. परंतु उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर सकाळी 07.00 वाजता हजर राहणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी लेखी परीक्षेसाठी वर नमुद ठिकाणी दिलेल्या तारखेस परीक्षेचे सकाळी 07.00 वाजता पोहचणे आवश्यक आहे. **तसेच लेखी परीक्षेकरीता या कार्यालयाकडुन पॅड व ब्लॅक बॉल पेन पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी लेखी परीक्षेकरीता येतांना सोबत फक्त प्रवेशपत्र (हॉल तिकीट), आवदेन अर्ज, पासपोर्ट साईज फोटो व मुळ आधारकार्ड आणावे**. इतर कोणतेही किंमती वस्तु, कॅल्क्युलेटर, स्मार्टवॉच, मोबाईल फोन, हेडफोन, ब्ल्युटुथ-हेडफोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत बाळगु नये.

भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखीव ठेवण्यात आले आहे.

ठिकाण :- समादेशक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
दिनांक :- 10/07/2024.

**( रमेश ब. वेठेकर )**
सहायक समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.14 (भाराब-1),
छत्रपती संभाजीनगर.